महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

मंगळवार ❖ ३१ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १८६ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

# प्रशासनासह , पोलीस दलात बदलांचे संकेत



## अनेक अधिकाऱ्यांची उचलबांगडी ?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**मुंबईः राज्यातील प्रशासनात आणि पोलीस दलात येत्या काही महिन्यांत मोठे बदल होणार आहेत. अनेक अधिकाऱ्यांना पदावरुन हटवलं जाण्याची शक्यता आहे. आठवड्यापूर्वीच बीडच्या पोलीस अधीक्षकांची उचलबांगडी करण्यात आली. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासात दिरंगाई केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रशासनावरील त्यांची पकड घट्ट करण्यासाठी बरेच फेरबदल करण्याच्या तयारीत आहेत. टाईम्स ऑफ इंडियानं सुत्रांच्या हवाल्यानं याबद्दलचं वृत्त दिलं आहे.**

मुख्यमंत्री फडणवीस प्रशासनासह पोलीस दलात मोठे बदल करण्याच्या तयारीत आहेत. गेल्या १० वर्षांतील कामाचं मूल्यमापन करुन अधिकाऱ्यांना नवीन पोस्टिंग देण्यात येईल. २०१४ ते २०१९ या कालावधीत फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या पोस्टिंगमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. २०२२ मध्ये देवेंद्र फडणवीस पुन्हा सत्तेत आले. पण तेव्हा त्यांना उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावं लागलं. त्यावेळी गृहमंत्रिपद त्यांच्याकडेच होतं.

२०१४ ते २०१९ या कालावधीत मुख्यमंत्री असताना फडणवीसांनी अधिकाऱ्यांना त्यांच्या दोन दशकांच्या कामगिरीच्या आधारे नव्या जबाबदाऱ्या दिल्या होत्या. स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्यांना फडणवीसांनी महत्त्वाच्या पदांवर पाठवलं होतं. आता पुन्हा एकदा फडणवीस तोच पॅटर्न राबवण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनात धास्ती आहे. काही अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या देताना त्यांची एकाधिकारशाही निर्माण होणार नाही याची काळजी फडणवीसांनी घ्यावी, असं अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटतं.

२०१९ ते २०२४ या कालावधीत राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडल्या. न भूतो न भविष्यती अशा घटना पाहायला मिळाल्या. आधी महाविकास आघाडीचं सरकार असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या निकटवर्तीयांना मोठी पदं, जबाबदाऱ्या मिळाल्या. त्यानंतर २०२२ मध्ये एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात युतीचं सरकार आलं. या कालावधीत बहुतांश जुन्या अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदं देण्यात आली, असं टाईम्स ऑफ इंडियानं वृत्तात म्हटलं आहे. आता फडणवीसांकडे मुख्यमंत्रिपदासह गृहमंत्रिपदही असल्यानं पोलिसांच्या बदल्यांवरही त्यांचा कंट्रोल असेल. २०१९ ते २०२४ या कालावधीत अशी परिस्थिती नव्हती. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री वेगवेगळ्या पक्षाचे असल्यानं अनेकदा पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरुन सरकारमध्ये खटके उडाले.

---

# अतिक्रमण व चोरटी वृक्षतोड ठाणे जिल्ह्यातील वन विभागाच्या जमिनींत मोठी घट



### भ्रष्ट वन कर्मचाऱ्यामुळे आतिक्रमण ! वन जमिनींवर वसाहतीची उभारणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील वन क्षेत्राची जमीन मोठ्या प्रमाणात कमी होत आहे. हे क्षेत्र घटत असल्याने वन विभागाचे अधिकारी मग करतात काय असा प्रश्न चर्चीला जात आहे.

ठाणे जिल्ह्यातील नवी मुंबई येथील वन जमिनीवर आतिक्रम होऊन तेथे वसाहती उभारल्या जात आहेत. काही वन जमिनीच्या टेकड्याची माती चोरी रात्री सुरु असते, येथील वन जमीन कागदपत्री असणारी वन जमीन आणि प्रत्यक्ष ताब्यात असलेली वन जमीन यात मोठी तफावत आहे. अनेक वर्ष वन जमिनीची मोजणी करण्यात आलेली नाही त्यामुळे वनविभाग अधिकारी आपल गेले लठ्ठ पगार घेऊन बिनधास्त पणे आपल्या नजरे समोर आतिक्रम पाहत आहेत. ही स्थिती कल्याण, अंबरनाथ व मुरबाड व शहापूर व भिवंडी तालुक्यात कायम आहे.

**कल्याण तालुक्यात निम्मे वन जमीन अतिक्रमणा खाली.**

कल्याण तालुक्यातील सात हजार हेक्टर वन जमीन कागदावर आहे. मात्र वन विभागाच्या ताब्यात तीन हजाराहून कामी जमीन ताब्यात आहे. नागरिकरनाच्या नावाखाली येथील वन विभागाचे कर्मचारी स्वतःच दलाल बनून ही जमीन अतिक्रमनाखाली कशी जाईल यासाठी प्रयत्न करत आहेत. येथील भ्रष्ट वन कर्मचाऱ्यामुळे आतिक्रमन होणाऱ्या जमिनीवरील बांधकामात स्वतःचा हिस्सा ठेवून जमीन गेली तरी चालेल. आपला खिसा भरला म्हणजे झाले.

अंबरनाथ, शहापूर, मुरबाड, भिवंडी तालुक्यात राजकारणी व वन विभाग अधिकारी एकत्र युती करून आपल्याच वन जमिनीची माती करत आहेत. काही राजकारण्यांनी शकडो हेक्टर जमिनी स्वतःच अतिक्रमन करून हडप केल्या आहेत. वन क्षेत्र कामी झाले तरी चालेल अपल्याला जमिनी मिळाल्या बस्स याचा फटका मूळ वन जमिनीला बसत आहे.

एकीकडे सरकारी प्रकल्प राबविण्यासाठी वन जमीन मोठ्या प्रमाणात ताब्यात घेतली जात आहे.आता हीच स्थिती राहिली तर ठाणे जिल्हात वन जमीन फक्त कागदावर असणार आहे. वन मंत्री या जिल्ह्याचे भूमिपुत्र आहेत. त्यांनी आपल्याच जिल्ह्यातील कमी होणारे वन जमिनीचे रोखयचे कसे याकडे लक्ष द्यावे.



# मुंबई – ठाणे मेट्रो मार्गिकांसाठी निविदा जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबईकरांचा प्रवास वेगवान करण्यासाठी मेट्रोचं जाळं उभारण्यात येत आहे. मात्र, असं असतानाही श्ईईंला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळं मेट्रोचे प्रकल्प सुरू होण्यास विलंब होत आहे. वडाळा ते कासारवडवली मेट्रो ४, कासारवडवली ते गायमुख मेट्रो ४अ आणि स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी मेट्रो ६ या मार्गिकांसाठी ५७ गाड्यांच्या खरेदीसाठी काढलेल्या निविदा अखेर १० महिन्यांनी खुल्या केल्या आहेत. त्यामध्ये रस्ते आणि पायाभूत क्षेत्रातील लार्सन अँड टुब्रो लि., एनसीसी लि. या कंपन्यांनीही आता मेट्रो डब्बे निर्मितीच्या क्षेत्रात उतरण्यासाठी निविदा भरल्या आहेत

एमएमआरडीएने मेट्रो सहा मार्गिकेसाठी जानेवारीमध्ये निविदा मागविल्या होत्या. या १५.३१ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिकेसाठी २,०६४ कोटी रुपयांच्या निविदा काढली होती. यातून मेट्रो ६ मार्गिकेसाठी १८ गाड्या खरेदी केल्या जाणार होत्या. या निविदांना तब्बल ११ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर पान ४ वर ▶▶

## मुंबई भागविणार ठाण्याची तहान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मुंबई महापालिकेच्या कोट्यातून ठाणे महापालिकेला अतिरिक्त ५० एमएलडी पाणी मिळावे यासाठी आमदार संजय केळकर यांनी आज दोन्ही महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची मुंबईत संयुक्त बैठक घेतली. यावेळी मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून अधिकाऱ्यांना तांत्रिक अडचणी दूर करून कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. ठाण्याला विशेषतः घोडबंदर परिसर, बाळकुम, कोलशेत, ढोकाळी आदी भागात पाणीटंचाई भेडसावत आहे. अशात आणखी नवनवीन गगनचुंबी इमारती उभ्या राहत आहेत. त्यामुळे भविष्यात पाण्याचा तुटवडा आणखी मोठ्या प्रमाणात भासणार आहे. त्यादृष्टीने आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात अनेकवेळा वाचा फोडली असून ठाणे महापालिकेसह मुंबई पान ४ वर ▶▶

# थर्टी फस्टसाठी फार्महाऊस, रिसॉर्ट बुक

### ग्रामीण भागात पर्यटकाची धूम



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

**ठाणे :** आज डिसेंबर महिन्याचा शेवटचा दिवस. अर्थात थर्टी फस्ट ३१ डिसेंबर सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी. व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी एकत्र जमून मौज मजा करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वच फार्म, रिसॉर्ट, वीक अँड होम बुक झाली असून जिल्ह्यातील कल्याण, अंबरनाथ, शहापूर, मुरबाड सह भिवंडी तालुक्यातील सर्वच हॉटेल्स व धाबे ही या हौसी लोकांनी गजबजून गेले आहेत. काही फार्म हाऊस, तसेच रिसॉर्ट संपूर्ण कुटूंबाने बुक केले आहेत. तर काही फार्म मित्र परिवाराने बुक केले आहेत. निमित्त नववर्षे स्वागताचे असले तरी या निमित्ताने होणाऱ्या पार्ट्या तसेच डीजे ची धूम याने ग्रामीण भागातील ग्राम संस्कृती मात्र हद्दपार करेल असेच वातावरण निर्माण केले जात आहे.

नवं वर्ष व सरत्या वर्षाला निरोप देण्याचे फक्त कारण पुढे करत हा सारा खटाटोप सुरु आहे. त्यामुळे गावातील दारू बंदी आता कागदोपत्री राहिली आहे. हे चित्र भयाण असून फार्म बार बनत आहेत. तर रिसॉर्टला बार चे स्वरूप आलेले आहे.

**वाईन ची दुकानं सजली :** विशेष म्हणजे यासाठी लागणारी दारू आपल्याच दुकानातून घ्यावी या हेतूने वाईन विक्रेत्यांनी आपल्या दुकानाना विदयुत रोषणाई करत, ग्राहक आकर्षण करण्यासाठी चक्क वाईन खरेदीवर सवलत योजना आणल्या आहेत.

---

# मुंबई बाजार समितीला देणार जागतिक दर्जा

## मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावले जातील

### - पणन मंत्री जयकुमार रावल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**ठाणे, दि.३० :** महाराष्ट्र कायम अग्रगण्य राहिलेला आहे. १९७७ ला नवी मुंबई मार्केट कमिटी बनविण्यात आली त्यावेळी ती भारतातली आणि आशिया खंडातील सर्वात मोठी मार्केट कमिटी होती. काळाच्या ओघात अनेक नवीन मार्केट कमिट्या निर्माण झाल्या. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची सध्याची जागा आता कमी पडत आहे, मात्र ही बाजार समिती कार्यान्वित राहणार असून काळाच्या गरजेनुसार आणखी बाजार समित्या कार्यान्वित केल्या जातील. ही बाजार समिती भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वोत्कृष्ट बाजार समिती असेल हेच आमचे ध्येय आहे. महाराष्ट्र कायम नंबर वन राहिला आहे. जगातील पहिल्या तीन सर्वात मोठ्या मार्केट कमिट्यांचा अभ्यास करून महाराष्ट्रामध्ये तितकीच तुल्यबळ एक नवीन ‘महामुंबई मार्केट कमिटी’ बनविणार, जी जगामध्ये महाराष्ट्र राज्याचे नाव मोठे करेल, असा संकल्प या खात्याचा मंत्री या नात्याने मी केला आहे. या बाजार समितीच्या माध्यमातून सर्वांनी एकत्र येवून आदर्श काम उभे करू या. यासाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावले जातील, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री श्री.जयकुमार रावल यांनी आज येथे केले.

राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री श्री.जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशी येथे आढावा बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी माजी मंत्री तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे



संचालक शशिकांत शिंदे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, उपसभापती धनंजय वाडकर, सचिव डॉ.पांडूरंग खंडागळे व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

मंत्री श्री.रावल पुढे म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे पुनर्विकासाचे काम प्रस्तावित आहे. याचे नियोजन करताना पुढील ५० वर्षांचे नियोजन करावे. हे काम टप्प्याटप्प्याने वेगाने पूर्ण केले जाईल. पुढील ४५ दिवसात या कृषी उत्पन्न बाजार समिती विषयीच्या विविध प्रश्नांबाबत ठोस निर्णय घेण्यात येतील. राज्य व केंद्र शासनाची मदत घेवून आशियातील सर्वात मोठी मार्केट कमिटी आहे, या लौकिकाला साजेसे काम करूया. जगातील इतर आघाडीच्या मार्केट कमिट्यांचा अभ्यास करावा. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महोदयांकडे बैठकीसाठी वेळ मागितला जाईल व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रलंबित विषयांबाबत सविस्तर चर्चा व उपाययोजनांसंबंधीचे नियोजन करण्यात येईल. येत्या काळात सद्यःस्थितीत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अख्यत्यारीतील बाजारपेठांचे विभागनिहाय कृषी मेळावे घेणे प्रस्तावित आहे.

ते पुढे म्हणाले की, सर्व घटकांना एकत्र घेवून या कृषी उत्पन्न बाजार समितीचा विकास साधला जाईल. शेतकऱ्यांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी सकारात्मक निर्णय घेतले जातील. शेतकऱ्यांच्या हितासाठी राजशिष्टाचार आणि पणन विभागाचा मंत्री या नात्याने या दोन्ही विभागांची सांगड घालून शेतकऱ्यांसाठी काही उपयुक्त निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. लोकांसमोर आपल्याला आदर्श काम ठेवावेच पान ४ वर ▶▶

> “ महाराष्ट्र कायम अग्रगण्य राहिलेला आहे. १९७७ ला नवी मुंबई मार्केट कमिटी बनविण्यात आली त्यावेळी ती भारतातली आणि आशिया खंडातील सर्वात मोठी मार्केट कमिटी होती. काळाच्या ओघात अनेक नवीन मार्केट कमिट्या निर्माण झाल्या. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची सध्याची जागा आता कमी पडत आहे, मात्र ही बाजार समिती कार्यान्वित राहणार असून काळाच्या गरजेनुसार आणखी बाजार समित्या कार्यान्वित केल्या जातील. ही बाजार समिती भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वोत्कृष्ट बाजार समिती असेल हेच आमचे ध्येय आहे. महाराष्ट्र कायम नंबर वन राहिला आहे. जगातील पहिल्या तीन सर्वात मोठ्या मार्केट कमिट्यांचा अभ्यास करून महाराष्ट्रामध्ये तितकीच तुल्यबळ एक नवीन ‘महामुंबई मार्केट कमिटी’ बनविणार, जी जगामध्ये महाराष्ट्र राज्याचे नाव मोठे करेल, असा संकल्प या खात्याचा मंत्री या नात्याने मी केला आहे.
>
> **पणन मंत्री जयकुमार रावल**

# ग्रंथ पूजनाने ठाणे ग्रंथोत्सव २०२४ चे उद्घाटन संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) :**
महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने 'ठाणे ग्रंथोत्सव २०२४' चे आयोजन कोपरखैरणे येथील ज्ञान विकास संस्था येथे करण्यात आले आहे. या भव्य ग्रंथोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजन करून आज करण्यात आले.

यावेळी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, ज्ञान विकास संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष अ‍ॅड पी.सी.पाटील, प्रा.माणिकराव कीर्तन वाचनालय वाशीचे सुभाष कुळकर्णी, ज्ञान विकास संस्थेचे उपध्याक्ष राम पाटील, जेष्ठ संचालक अशोक पाटील, श्री.सोन कांबळे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक देवेंद्र भुजबळ, जेष्ठ कवी अरुण म्हात्रे, ठाणे जिल्हा ग्रंथाचे अध्यक्ष चांगदेव काळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

ज्ञान विकास संस्थेचे प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, डी. व्ही. एस. इंग्रजी प्राथमिक माध्यमिक, डी. एस. महाविद्यालय, डी. व्ही. एस कॉलेज ऑफ कॉमर्स अँड. पी. सी. पाटील विधी महाविद्यालयचे विद्यार्थी या ग्रंथोत्सव दिंडी मध्ये सहभागी झाले होते. तसेच या ग्रंथोत्सव दिंडी नवी मुंबई महानगरपालिका परिमंडळ - २ उप आयुक्त कैलास गायकवाड, प्रा.माणिकराव कीर्तन वाचनालय, वाशीचे सुभाष कुलकर्णी, ज्ञान विकास संस्था कोपरखैरणेचे संस्थापक - अध्यक्ष पी. सी. पाटील, ठाणे जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील तसेच शाळा कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ज्ञान विकास संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष अ‍ॅड पी.सी.पाटील म्हणाले की, शासनाच्या सर्व कार्यक्रमांना आमच्या विद्यालयाकडून प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करतो. आमच्या विद्यालयातील सर्व विद्यार्थी कमीत कमी एक पुस्तक खरेदी करतील. वाचन चळवळ वाढविण्यासाठी हे आवश्यक आहे. ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे काम करतात. स्वतःला अद्यावत ठेवणे, स्पर्धेत टिकून रहाणे यासाठी वाचनाला पर्याय नाही. वाचनामुळे विचारात प्रगल्भता येते. नवे विचार मांडून समाजाला दिशा देणे हे ग्रंथाचे काम आहे. शासनाच्या कोणत्या उपक्रम राबविण्यासाठी हे विद्यालय नेहमी सहकार्य करेल.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर म्हणाले की, या ग्रंथोत्सवमधून आपल्या ज्ञानाचे खाद्य आपल्याला मिळणार आहे. आपण खूप भाग्यवान आहात इतका मोठा कार्यक्रम आपल्या शहरात होत आहे. या कार्यक्रमासाठी आपल्या पालकांना सुध्दा घेवून या. आपल्या आवडणाऱ्या लेखाचे एकतरी पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने वाचायला पाहिजे. ही पुस्तक आपण व पालकांनी तसेच शिक्षकांनी खरेदी करावी. वाचनाची आवड वाढली पाहिजे, यासाठी शासनाने आता वाचन प्रकल्प हाती घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे पुस्तक एक तास वाचले पाहिजे. तुम्ही काय वाचले आहे, याचे परीक्षण आपल्या हाताने लिहायचे आहे. ते परीक्षण आपल्या महाविद्यालयामध्ये जमा करायचे आहे. ही संकलित माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात येणार आहे. शासन यातून चांगले वाचक विद्यार्थ्यांना पारितोषिक देणार आहे. १ ते १५ जानेवारी मध्ये या वाचन साप्ताह राबविण्यात येत आहे, यामध्ये आपण सहभागी व्हावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माजी पंतप्रधान मनमोहन सिंह व प्रसन्ना पाटील यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. मंगळवार, दि.३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ११:३० या कालावधीत संगीतवर्षा कला प्रतिष्ठान प्रस्तुत 'गाथा शिवकालीन इतिहासाची'या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११:३० ते ०१ या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा ज्ञानभाषा कशी बनेल?' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ०३ ते ४:३० या कालावधीत 'क-कवितेचा'या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४:३० ते ०६ या कालावधीत ज्ञान विकास संस्था, कोपरखैरणे यांच्या कोळीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे. सायंकाळी ०६ ते ०७ या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील आदर्श ग्रंथपालांचा व उत्कृष्ट वाचकांचा सत्कार करण्यात येणार आहे. तरी, ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रंथप्रेमींनी या ग्रंथोत्सवास भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील व सूत्रसंचालन संतोष जाधव तर आभार प्रदर्शन प्रतिभा पाटील यांनी केले.

## मीरा भाईंदर पालिका आयुक्तांकडून स्थळ पाहणी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/भाईंदर(प्रतिनिधी) :**
मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांनी जेसल पार्क येथील बालाजी मैदान, ओपन जिम, व्हॉलीबॉल मैदान, गुलाब बाग, योगसाधना शेड, एस.टी. बस डेपो येथे स्थळ पाहणी करून आढावा घेतला.

मैदानात खेळणारे खेळाडू, ओपन जिम सामग्री वापरणाऱ्या महिला यांची मा. आयुक्त यांनी भेट घेत, त्यांच्यासोबत एकंदरीत जेसल पार्क मध्ये उद्भवणाऱ्या समस्यांबाबत चर्चा करून, समस्येचे तात्काळ निवारण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (उद्यान) कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, उद्यान अधिक्षक व महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

## कल्याणमध्ये भोंदू बाबाने विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार

### पिडित मुलीची खडकपाडा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण आंबिवली नजीक मोहने परिसरात बाबागिरी करणार्या भोंदू बाबाने एका मुलीचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार घडल्याचे पिडित मुलीच्या तक्रारीवरून उजेडात आला आहे.

मोहने येथील विठ्ठल वाडी परिसरात राहणाऱ्या बाबागिरी करणारा भोंदू बाबा अरविंद जाधव याने पिडीत मुलीच्या कुटुंबातील व्यक्तीची अडचण सागंण्याच्या बहाण्याने पिडीत मुलीस एका रुम मध्ये एकटे बसवित विनयभंग केल्याची घटना घडली. भोंदू बाबा याने त्या पिडीत मुलीस हा प्रकार कोणाला सांगितला तर, तुझ्या फॅमली सोबत वाईट करेल अशी धमकी दिली. या प्रकरणी पिडित मुलीने खडकपाडा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार केली असता खडकपाडा पोलिसांनी तक्रारीची दखल घेत भोंदू बाबा अरविंद जाधव यांच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला असून घटने संदर्भात पोलीस अधिक तपास करीत असल्याची माहिती खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांनी दिली.

## कल्याणमध्ये शेजारच्याचा कुटुंबीयावर कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला

### रॉकेल टाकून घर जाळण्याचा प्रयत्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याणमध्ये शेजाऱ्याने शेजारच्या कुटुंबीयावर केला कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला करत रॉकेल टाकून घर जाळण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार कल्याण पश्चिमेतील चिकणघर परिसरात घडला आहे. या हल्ल्यात चार जण जखमी झाले असून यामध्ये तीन महिला तर एका पुरुषाचा समावेश आहे. याप्रकरणी आरोपी चेतन मांदळे याला महात्मा फुले पोलिसांनी अटक केली आहे.

शेजाऱ्यांच्या बडबडीमुळे झोप येत नाही या कारणावरून शेजारच्या तरुणाने त्याच्याशी वाद घातला. इतकेच नव्हे तर संतापलेल्या तरुणाने शेजाऱ्याचे घर रॉकेल ओतून पेटवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर कुऱ्हाडीने शेजारील कुटुंबावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात चार जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी मुंबई येथील रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. महात्मा फुले पोलिसांनी यामधील हल्लेखोर आरोपी चेतन मांदळे याला ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. आरोपी चेतन हा खाजगी बँकेत नोकरी करतो. महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## थर्टीफर्स्टसाठी कल्याणमधील पोलिस यंत्रणा सज्ज

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
३१ डिसेंबर २०२४ सरत्या वर्षाला निरोप देण्या करिता परिमंडळ ३ कल्याण मधील पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. परिमंडळ ३ कल्याण मधील सर्व पोलीस स्टेशन मध्ये थर्टीफर्स्ट निमित्त बंदोबस्त लावण्यात येणार असून बंदोबस्ताकरिता २ सहाय्यक पोलीस आयुक्त, ८३ पोलीस अधिकारी, ५३२ पोलीस अंमलदार असा पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

तसेच परिमंडळातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये पोलीस स्टेशन निहाय एकूण १७ ठिकाणी नाकाबंदी, फिक्स पॉईंट व पायी पेट्रोलिंग, २७ बीट मार्शल पेट्रोलिंग, २० पेट्रोलिंग मोबाईल, ८ प्रतिबंधक पथक, ८ छेडछाड विरोधी पथक, ८ बार आस्थापना चेकिंग पथक, ८ तपास पथक, ८ गोपनीय पेट्रोलिंग पथक आदी कार्यरत राहणार आहेत. तसेच वाहतूक शाखेचे ८ ब्रेथ एनालायझर मशीन सह १० ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

## कल्याण परिमंडळ ३ मध्ये नशेखोरांविरोधात कारवाई सुरूच

### रविवारी १०८ नशेखोरांवर आणि ९२ मोटारसायकलस्वारांवर कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
अल्पवयीन मुलीची हत्या आणि इतर वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांनंतर कल्याणचे पोलिस उपायुक्त अतूल झेंडे यांनी पोलीस प्रशासनाला चांगलेच ॲक्शन मोडमध्ये आणल्याचे दिसत आहे. कल्याणच्या विविध भागांमधील नशेखोरांना ताब्यात घेत डीसीपी अतुल झेंडे यांनी चांगलाच इंगा दाखवला. पोलीसी खाक्या दाखवण्यासह अनेक नशेखोरांना उठाबशा काढायला लावल्या आणि पोलीसांनी त्यांची वरातही काढल्याचे दिसून आले. पोलीस उपायुक्तांच्या या कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले असून अशा प्रकारची कारवाई सतत सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. कल्याण परिमंडळ ३ मधील विविध पोलीसस्टेशन अंतर्गत मोकळी मैदानी, निर्जनस्थळे व रोडवरील आस्थापना यांच्यावर पोलिसांतर्फे धडक कारवाई सुरू असून रविवारी रात्री या ठिकाणी एकुण १०८ नशेखोरांविरोधात कारवाई करण्यात आली.

तसेच रोडवरील अती वेगाने मोटार सायकल चालवणे आणि ट्रिपल सीट वाहन चालवणे अशा एकूण ९२ कारवाई कल्याणमध्ये पोलिसांकडून करण्यात आल्या आहेत. पोलिसांची धडक कारवाई मोहिम अशीच सुरू राहणार असल्याची माहिती पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली. पोलिसांच्या या कारवाई सत्रामुळे नशेखोरांचे मात्र धाबे दणाणले आहेत.

### केडीएमसीच्या शिक्षण विभागामार्फत

## मनपास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शिक्षण विभागामार्फत कल्याण पश्चिमेतील अचिव्हर्स महाविदयालयात मनपास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजन करण्यात आले असून, या प्रदर्शनाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु तथा बिर्ला महाविद्यालय कल्याणचे संचालक, डॉ.नरेशचंद्र यांनी केले.



विज्ञान प्रदर्शनामध्ये शालेय विद्यार्थ्यांकडून वाहतुक व दळणवळण ट्रॅफिक, घनकचरा व्यवस्थापन (कचरा वर्गीकरण), वायु प्रदुषण इ. प्रकल्प सादर करण्यात आले. यामध्ये नागरिकांना भेडसावणा-या समस्यांचे निराकरण कसे करावे, याबाबत उपाययोजना शोधण्याचे सादरीकरण प्रकल्पांच्या माध्यमातून करण्यात आले. या नाविन्यपूर्ण विज्ञान प्रकल्पांची पाहणी करताना हे महानगरपालिका स्तरीय प्रकल्प राज्यस्तरापर्यंत जावेत यासाठी डॉ.नरेशचंद्र यांनी विदयार्थी व शिक्षक यांना शुभेच्छा दिल्या. तर विदयार्थी हे उदयोगाभिममुख व्हावेत यासाठी अचिव्हर्स महाविद्यालयाचे डॉ.महेश भिवंडीकर यांनी मार्गदर्शन केले आणि विदयार्थ्यांच्या सद्यपरिस्थितीवर पर्यावरण पुरक प्रकल्प व विदयार्थी कल्पकता यांचे कौतुक केले.यावेळी शिक्षण विभागाचे उपआयुक्त प्रसाद बोरकर, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण यांनी केले. विज्ञान प्रदर्शन हे २ दिवस पालक-विद्यार्थ्यांसाठी खुले राहणार आहे.

## सरत्या वर्षाला निरोप नवीन वर्षाचा आरंभ



वर्ष कसे येते कसे जाते कळत नाही. वर्षाचे ३६५ दिवसाचे मात्र विविध पद्धतीने आपल्या आयुष्यात घेतेलेले चांगले वाईट वळण आपण कधीही विसरू शकत नाही.नवीन वर्ष साजरे करण्याचे विविध पद्धती आहेत. रांगोळी ,सजावट नाच गाणे ,जेवणाच्या पार्ट्या वगैरे नवीन वर्षाच्या सुरवातीला म्हणजे १ जानेवारीचे आधुनिक महत्त्व म्हणजे बऱ्यापैकी लोक नवीन संकल्प करतात, जसे की आरोग्य सुधारणे, नवे ध्येय गाठणे, किंवा वाईट सवयी बदलणे असा निश्चय करणारी मंडळी आहेत. खरे म्हणजे हे वर्ष ग्रेगोरियन कॅलेंडरच्या नुसार १ जानेवारी हा दिवस सौर कॅलेंडरनुसार वर्षाचा पहिला दिवस मानला आहे आणि आधुनिक जगात नव्या सुरुवातीचा संकेत आहे. हा दिवस मानवी इतिहासातील खूप मोठ्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि खगोलशास्त्रीय बदलांचा भाग आहे.

२०२४ हे वर्ष कसे गेले याबाबतीतल्या चर्च्या करत सरत्या वर्षाला निरोप देणं ही केवळ एक परंपरा नाही, तर आपल्या जीवनातील आठवणींच्या गाठी बांधून, नवीन स्वप्नांसाठी मार्ग मोकळा करण्याची संधी आहे. २०२४ ने आपल्याला खूप काही दिलं, शिकवलं, कधी हसवलं, तर कधी रडवलं. त्या साऱ्या क्षणांची आठवण आपण आज ताजीतवानी करतो आहोत.

वर्षभराच्या आठवणींचा वेध घेत प्रत्येक सनाचा आनदचा क्षण मात्र आठवत असतो.होळीच्या रंगांनी भरलेला पाण्याचा खेळ, कोण कधी भेटले कसा रंगवला विविध गंमती जमती कश्या केल्या. विशेष तरुण मुलांचा शाळा कॉलेजमधल्यांचा व्हॅलेंटाईन डे स्पेशल ,गॅदरिंग ट्रिप तसेच गणपती बाप्पांसोबत केलेला आनंदाचा उत्सव, विविध मंडळाचे देखावे रात्रभर आपण कसे किती फिरलो कोणता देखावा कसा होता किती गम्मत केली तसेच दिवाळीतल्या दिव्यांच्या रोषणाईने उजळलेली रात्र, आकाश कंदील ,कोणती रांगोळी काढली, कोणते पदार्थ केले .विविध मेजवान्या कश्या केल्या सेल्फी कुठे कधी काढला ... सेल्फी फंड्यामुळे तर अजूनच आठवणीना उजाळा येतो.

ऑफिसमधील प्रमोशन, व्यवसायातील टप्पा गाठलेला यश, आनंद एखाद्या हृदयाने गोड केलेली ओळख, मित्र मैत्रिणी आणि कधी वाईट अनुभवांनी दिलेली शिकवण...

या सगळ्या क्षणांना आपण धन्यवाद देतो, कारण त्यांनी आपल्याला अधिक मजबूत बनवलं. जीवन कसे जगावे हे शिकवले.आपण मानवी जीवन म्हणजे इच्छा व विविधप्रकारची स्वप्नं पूर्ण करणाऱ्या धावत्या गाडीचा प्रवास करणारी आहोत. या प्रवासात काही स्वप्नं पूर्ण झाली, काही अजून ध्येयाच्या मागे आहेत. पण महत्वाचं म्हणजे, आपण थांबलो नाही.... आणि हरलो नाही .आणि अजून खूप काही करायचं आहे आणि जिंकायचं आहे हेच ध्येय ठरवून २०२४ च्या शेवटच्या काही दिवसांत आपण आपलं मन नवीन उमेदीनं भरतो आहोत, २०२५ च्या स्वागतासाठी सज्ज होत आहोत. आणि आनंदाने गाणे आठवते.... भले बुरे ते घडून गेले विसरून जाऊ सारे क्षणभर जरा विसावू या वळनावर् या वळणावर ... निरोप तुझा घेताना लागे ठेच मनाला ... गेलेले वर्ष पुन्हा मात्र कधीच परत येत नाही ...आणि

नवीन वर्षाच्या आशा आणि अपेक्षा घेऊन पुन्हा सज्ज आपली जीवनाची गाडी आता उगवत्या सूर्याकडे पुढा करून स्वागत करत आहे.

**२०२५ ची पहाट नवी....होवो यशाचा सूर्य सोनेरी,**
**सप्तरंगानी जिंकून घेऊ नव्या स्वप्नांची कहाणी.....**
**नवीन उर्जा, नवीन दिशांसाठी सज्ज होऊया,**
**प्रत्येक क्षणाला उत्सव मानून आनंदाने जगूया.**
**सरलं वर्ष, सरल्या आठवणी,**
**नवा सुर्य नवा प्रकाश,**
**स्वप्नांच्या गगनात भरारी,**
**चला घेऊ नवीन विश्वास.**
**झाले दुःख, झाले सुख,**
**मनाचं गाठोडं भिजलं,**
**संकल्पांनी सजलं मन,**
**नव्या आशेने उजळलं.**
**जगणं हे आहे प्रवास,**
**स्वप्नांना घेऊन ध्यास,**
**प्रगतीचा नवा होऊ राज,**
**नवीन वर्ष, नवीन विजयाचा आज!**

२०२५ च्या नव्या वाटचालीला सर्वांना खूप खूप शुभेच्छा, हा प्रवास आनंद, समाधान आणि यशाने भरलेला असावा!!!




**३१ डिसेंबर २०२४**
**मंगळवार**

**मेष**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. व्यावसायिक क्रियाकलापांमध्ये खूप लक्ष देणे आवश्यक आहे. नवीन करार होतील आणि प्रतिष्ठा वाढेल.

**वृषभ**
काही विशेष कामही मार्गी लागणार आहे. स्वतःसाठी काम करा. कोणत्याही कौटुंबिक वादाचे निराकरण अनुभवी व्यक्तीच्या मध्यस्थीने होईल.

**मिथुन**
ऑफिसमध्ये कामाचा प्रचंड ताण असल्याने हे काम घरीही करावे लागणार आहे. आज काही प्रलंबित कामे पूर्ण होणार आहेत.

**कर्क**
आज परिस्थिती उत्कृष्ट असून घेतलेल्या निर्णयांचे चांगले परिणाम दिसून येतील. विद्यार्थ्यांना मुलाखत किंवा करिअरमध्ये योग्य यश मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह**
परस्पर संबंधात पुन्हा गोडवा येईल. काही विशेष यश प्राप्त होणार आहे. तुमचा राग आणि खूप शिस्तबद्ध असणे इतरांसाठी समस्या निर्माण करेल.

**कन्या**
परिस्थिती तुमच्या अनुकूल बदल घडवून आणत आहे. यावेळी, व्यवसायाच्या बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी खूप परिश्रम करावे लागतील.

**तूळ**
इतरांच्या वैयक्तिक कामांपासून स्वतःला दूर ठेवा. फक्त तुमच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक गोष्टींना महत्त्व द्या. समस्यांवर उपाय दिल्यास त्यांचे मनोबल वाढेल.

**वृश्चिक**
धार्मिक कार्यातही थोडा वेळ घालवा. व्यवसायात कोणाशीही व्यवहार करताना किंवा व्यवहार करताना अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

**धनु**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा प्रयत्न करतील. सरकारी नोकरी करणाऱ्या लोकांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**मकर**
आपली स्थिती मजबूत ठेवा.आज तुम्हाला प्रतिष्ठित लोकांसोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल. काळ अतिशय अनुकूल आहे.

**कुंभ**
जीवनशैली अधिक प्रगत ठेवण्याचा प्रयत्न करा. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**मीन**
कामे शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करा. अपेक्षित परिणाम मिळाल्याने मनामध्ये आनंद राहील आणि उत्पन्नाचे स्रोत मजबूत होतील.

दैनिक जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन– जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/– रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
– E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# आजची पिढी आणि पालक वर्ग

**- अरविंद उबाळे**



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
आज आपण पाहतो की, आपल्या आजूबाजूचे लोक एकमेकांपेक्षा कसे वेगळे आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. पण याला कुठेतरी आपणच जबाबदार आहोत. आई वडील आता मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करताना दिसतात. आणि वर बोलतात की जाऊदे आपल्याला नाही मिळाले पण माझ्या मुलांच्या नशिबात आहे तर त्यांना सर्व मिळाले पाहिज. हि मानसिकता जवळ जवळ सर्व पालकांची दिसत आहे. अरे पण त्यामुळे मुलांना पैशाची किंमत राहिली नाही. जे मागतो ते आपल्याला सहज मिळते असे त्यांना वाटते. परंतु त्या मागे आई वडिलांचे कष्ट दिसत नाहीत. मुलांना मॉल मध्ये घेऊन जाणे, लहानपणीच गरज नसताना मोबाईल घेऊन देणे, हॉटेल मध्ये घेऊन जाणे, मेनू कार्ड मुलांना देऊन तूला काय पाहिजे ते सांग. त्यामुळे कुठेतरी आपणच त्यांच्या बेजबाबदार वागण्याला खतपाणी घालत आहोत असे लक्षात येते.

त्याचा परिणाम सुद्धा त्यांच्या वाढत्या वयानुसार क्षणोक्षणी आपल्या समोर दिसतो. मग लहान लहान गोष्टीला पार्टी करणे, मित्र मैत्रिणी सोबत फिरायला जाणे हे सुरू होते. नंतर त्यांचे बोलणे चालणे यात बदल होतो. फॅशनच्या नावावर चित्र विचित्र कपडे घेणे, बरं त्याबद्दल त्यांना या गोष्टीसाठी विरोध केला तर तेच आपल्याला शिकवणार की तुम्हाला नाही समजत ही नवीन फॅशन आहे म्हणून पालकांनाच शांत बसवणार. आणि मग त्यावेळी पालक पण शांत बसतात. कारण मुलं ही समजवण्याच्या पलीकडे गेलेली असतात हे त्यांना तेव्हा समजते. तसेच त्यांना आपल्या मित्र परिवार शिवाय काहीच दिसत नाही. घरी असले तरी तासनतास मोबाईल वर मेसेज करणे, बोलणे सुरूच राहते. त्यात त्यांचा मित्र परिवार चांगला असला तर ठीक नाहीतर कल्याणच. मग खोटे बोलणे, पैसे घेणे पार्टी या नावावर पैसे उधळणे असले प्रकार सुरू होतात. त्यामुळे कुठेतरी पालकच मुलांची दिशा चुकीच्या मार्गावर नेत आहेत असे वाटते.

तसेच आपण पाहतो की मुलांना मोठ्या माणसांबद्दल आदर आहे की नाही हा विचार येतो. रेल्वेचा प्रवास करताना लक्षात येते आजची तरुण मुले वयस्कर लोकांना अरे तुरे, उद्धटपणे बोलताना आपण नेहमीच पाहतो. मुलांना शिक्षकांविषयी तर अजिबातच आदर दिसत नाही. शिक्षक हे आपले गुरु आहेत हे विसरून त्यांना उलट बोलणे, चेष्टा करणे असे प्रकार रोज आपल्या समोर येतात. त्यामुळे पालक वर्गाने आपल्या मुलांचे लाड जरुर करा पण त्यांना पैशाची किंमत समजावून सांगा, चांगले काय वाईट काय याचे शिक्षण त्यांना आपणच दिले पाहिजे. जसे आपले एकत्र कुटुंब पद्धत असताना आपल्यावर आजी आजोबा यांचे, घरातील थोर मोठ्यांचे संस्कार कळत नकळत होत होते. तसेच संस्कार आपल्या मुलांना देखील देणे हे आपले कर्तव्य आहे ना! काळ जरी बदलला तरी आपले संस्कार बदलता कामा नये तरच येणारी पिढी हि सुसंस्कुत पिढी म्हणून नावारूपाला येईल यात शंका नाही.

# भालचंद्र पाटील यांना आगरी समाज भूषण प्रदान




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
मुंबईत १९३५ साली स्थापन झालेल्या आगरी समाज संघ यांच्या विद्यमाने समाज मोहोत्सव साजरा करण्यात आला. त्या समयी समाजातील विविध क्षेत्रात सामाजिक कार्यकरणाऱ्या अनेक बांधवांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये भालचंद्र पाटील यांना आगरी समाज भूषण प्रदान करण्यात आला.

ठाणे जवळील खारीगांवचे सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र पाटील हे आपल्या समाज कार्यासाठी सुपरिचित आहेत. आगरी कोळी विकास मंच ठाणे, भूमिपुत्र धर्माभिमानी सेवा संस्था, जागृती मित्र मंडळ ठाणे, खारीगाव भूमिपुत्र शेतकरी संघटना आदी संस्था-संघटनांच्या माध्यमातून भालचंद्र पाटील हे समाजाबरोबर जोडलेले आहेत.

१९८७ साली त्यांनी जागृती मित्र मंडळ स्थापन करून तरूणांना समाजकार्याची दिशा दिली. नवी मुंबई विमानतळास लोकनेते दिबा पाटील यांचे नाव लागावे म्हणून ते नामकरण लढ्यात सहभागी झाले.

भालचंद्र पाटील हे खारीगाव येथिल श्री घोलाई देवी देवस्थानचे विश्वस्त आहेत. देवस्थानाच्या माध्यमातुन सुद्धा नियनित सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. आगरी समाज संघाचे अध्यक्ष पद्माकर म्हात्रे, सरचिटणीस सुभाष ठाकूर, कोषाध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष कृष्णा पाटील, उपाध्यक्ष डॉ.साजन पाटील, संकेत पाटील आणि संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी हा सोहळा यशस्वीपणे पार पाडला. भालचंद्र पाटील यांना 'आगरी समाज भूषण' हा बहुमान मिळाल्यामुळे येथिल ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

# खासदार सुरेश म्हात्रे यांनी केली पडघा टोल नाका कर्मचाऱ्यांची कानउघाडणी



## टोल वसुलीचे काम अकार्यक्षमपणे सुरू असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश (बाळया मामा) यांच्याकडुन पडघा टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी करण्यात आली. याठिकाणी टोल वसुलीचे काम अकार्यक्षमपणे सुरू असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सामान्य नागरिकांची होणारी गैरसोय आणि वाहतुकीचा गोंधळ पाहून खासदार म्हात्रे यांनी टोल नाक्यावर उतरत टोल कर्मचाऱ्यांना धारेवर धरले आणि व्यवस्थापनाची चांगलीच कानउघाडणी करत तातडीने वाहतूक सुरळीत करण्याचे निर्देश दिले.

# सरपंच डॉ कविता वरे यांना संसदभवनाचे निमंत्रण

## 'पंचायत से पार्लमेंट' या कार्यक्रमामध्ये राष्ट्रपती दौपदि मुर्मु करणार मार्गदर्शन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय महिला आयोगांतर्गत दि.६ जानेवारी २०२५ रोजी पंचायत से पार्लमेंट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, महाराष्ट्र राज्याची प्रशिक्षणाच्या क्षेत्रातील शिखर संस्था यशवंतराव चव्हाण प्रशासन व विकास प्रबोधिनी, यशदा, पुणे यांच्या कडून प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार जि.प. ठाणे ग्रामपंचायत विभागातून ठाणे जिल्ह्यात अनु. जमातीतील ग्रामपंचायत स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला सरपंच यांतून ग्रामपंचायत कारभारात सुसूत्रता, नियोजनबध्द कामकाजाची नोंद व प्रभावी ग्रामप्रशासन चालवणाऱ्या डॉ. कविता वरे, ग्रा.पं. किसळ ता. मुरबाड जि. ठाणे यांची निवड या कार्यक्रमासाठी करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रपती उपस्थित सरपंचांना मार्गदर्शन करणार आहेत.

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन निरीक्षकांचा स्नेहमेळावा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अनुज्ञापन विभागातील नवनिर्वाचित अनुज्ञापन निरीक्षकांचा स्नेहमेळावा बदलापूर येथील गंगानंद फार्म येथे उत्साहात पार पडला. या स्नेहमेळाव्याचा मुख्य उद्देश सर्व निरीक्षकांमध्ये ओळख आणि संवाद वृद्धिंगत करणे तसेच भविष्यात संघटित राहून महानगरपालिकेच्या कार्यांमध्ये अधिकाधिक प्रामाणिकता व एकात्मता निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमादरम्यान सहभागी निरीक्षकांनी आपापले अनुभव व समस्यांचे मांडणी केली आणि त्यावर एकत्रितपणे चर्चा केली.

यामध्ये समस्या सोडवण्यासाठी प्रभावी उपाययोजना सुचवण्यात आल्या. या संवादाच्या माध्यमातून एकजुटीची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व नवनिर्वाचित निरीक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला.त्यांच्या योगदानाने स्नेहमेळावा एक आदर्श उपक्रम ठरला. या स्नेहमेळाव्यामुळे भविष्य कालीन कामकाजासाठी नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# स्वर्ण भारत सन्मान सोहळा २०२४ संपन्न

## गणित आणि विज्ञान विषयातील तीन शिक्षिकांचा इंडिया प्राउड बुक ऑफ रेकॉर्डने केला सन्मान




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**
इंडिया प्राउड बुक ऑफ रेकॉर्ड ने मुंबईतील शैक्षणिक क्षेत्रातील, त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी २४ डिसेंबर २०२४ रोजी पाटीदार भवन, कल्याण येथे पुरस्कार सोहळा आयोजित केला होता.

सत्कारमूर्ती सौ .स्नेहा निनाद कर्णिक (सेंट जोसेफ स्कूल मालाड मुंबई), सौ पूनम अनिकेत दीक्षित ( न. जी वर्तक स्कूल विरार) आणि श्री विजय वाघेला (सेंट लॉरेन्स स्कूल अंधेरी) यांना मुंबई डिव्हिजनल बोर्ड येथील उत्कृष्ट कामगिरी आणि त्यांच्या गणित आणि विज्ञान विषयातील प्राविण्यामुळे ट्रॉफी , मेडल आणि सन्मान पत्र देवून गौरविण्यात आले.

या सत्कार सोहळयात प्रमुख पाहुणे शिर्डी संस्थानआचे ट्रस्टी डॉक्टर श्री शंकर अडाणी प्रमुख पत्रकार नंदगोपाल शर्मा आणि दिल्लीच्या प्राउड बुक ऑफ रेकॉर्डस चे प्रमुख श्री पारस शर्मा उपस्थित होते.

सत्कारमूर्तींचे पालक, विद्यार्थी समाज आणि सर्व स्तरातील लोकांकडून कौतुक होत आहे.

वरील तिन्ही सत्कारमूर्ती च्या पुढील वाटचाली साठी हार्दिक शुभेच्छा.

# कल्याणात ६८ व्या महाराष्ट्र राज्य वरिष्ठ बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेला सुरवात




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण पूर्वेतील दादासाहेब गायकवाड मैदान येथे माजी आमदार जगन्नाथ (आप्पा) शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशनच्या मान्यतेने कल्याण डोंबिवली महानगर बॉल बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ६८ वी महाराष्ट्र राज्य वरिष्ठ बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा (पुरुष) चे आयोजन करण्यात आले असून, रविवारी या स्पर्धांचे उद्घाटन कल्याण पूर्व येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार सुलभा गायकवाड, महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन अध्यक्ष पी.के. पटेल, कार्याध्यक्ष डी.एस. गोसावी, सचिव अतुल इंगळे, शिवसेना कल्याण पूर्व शहर प्रमुख निलेश शिंदे, एनसीपी प्रदेश सरचिटणीस सुभाष गायकवाड, कल्याण डोंबिवली मनपा उपायुक्त सचिन कामखाडे, कल्याण डोंबिवली एनसिपी सरचिटणीस मनोज नायर, उद्योगपती मच्छिंद्र जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# खरोशीत आदिवासी गरजूंना ब्लँकेटचे वाटप





**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**
पेण तालुक्यातील खरोशी येथे सारथी फाऊंडेशनचे संस्थापक, चेअरमन अशोक जंगले, शारदाश्रम विद्यामंदिर संस्था दादर,मुंबईचे प्राचार्य श्री नगरकर साहेब व त्याचे सहकारी मोरे, डावळे, प्रभू, प्राची मॅडम व इतर सहकारी , तसेच या दोन्ही संस्था बरोबर काम करणारे खरोशी गावातील सौ.मिनाक्षी गोपिनाथ पाटील व गोपिनाथ बाबुराव पाटील गणपत महादेव घरत यांच्या संयुक्त विद्यमाने खरोशी गावातील अपंग गरजू ,वृद्ध आदिवासी यांच्या सह अनेकांना मोफत ब्लँकेटचे वाटप व शालेय मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी शालेय विद्यार्थी व शिक्षकांनी लेझीम पथकाच्या सहाय्याने मान्यवरांचे स्वागत केले.कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक किशोर म्हात्रे समाजसेवक महेश पाटील, शाळेचे चेअरमन गणपत दामोदर पाटील आदिंसह मान्यवर मंडळी उपस्थित होते.

यावेळी सारथी फाऊडेनचे संस्थापक अध्यक्ष श्री जंगले यांनी सांगितले की आमच्या सारथी फाउंडेशन संस्थेकडून प्राथमिक शाळेला अखंड विज पुरवठ्यासाठी सोलर पॅनल युनिट भेट देण्याचे जाहीर केले. तर शारदाश्रम विद्यामंदिर संस्थेच्या अमृतमहोत्सवा निमित्ताने शाळेला एक संगणक देण्याचे प्राचार्य श्री. नगरकर यांनी जाहीर केले.


# नेहरू सेंटर आर्ट गॅलरी येथे समूह चित्र प्रदर्शनात व्यक्तिचित्रांना प्रतिसाद





**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी)**
नेहरू सेंटर आर्ट गॅलरी येथील दिनांक २४ ते ३० डिसेंबर २०२४ या कालावधीत आयोजित समूह चित्र प्रदर्शनात चित्रकार महादेव गोपाळे यांनी काढलेली व्यक्तिचित्रे खूप गाजली. त्यांनी राजकीय पुढारी,गायक, चित्रपटसृष्टीतील कलावंत यांची व्यक्तिचित्रे आता पर्यंत अनेक काढली आहेत. पण या प्रदर्शनात प्रदर्शित संत गाडगेबाबा, भीमसेन जोशी,राष्ट्रपती अब्दुल कलाम, भाऊराव पाटील,रतन टाटा यांची व्यक्तिचित्रे त्यांनी कॅनव्हासवर ॲक्रिलिक रंगविली. ही चित्रे पाहण्यासाठी चित्र रसिकांनी खूप गर्दी केली आणि त्यांचे कौतुक केले. त्यात कॅनव्हासवर ॲक्रिलिक माध्यमाचा वापर करून या चित्रांतून व्यक्ती, स्थान यांसोबतच अलंकरण, पेहराव यांचाही त्यांचा विशेष अभ्यास त्यांनी दाखविला. वारकरी व्यक्तिचित्र ,तसेच चुलीवर घावणे बनविण्यात व्यस्त असणाऱ्या स्त्री चित्रात याचा प्रत्यय येतो. त्यांनी बिंदू आणि तिरप्या रेषांच्यासाहाय्याने वेगवान फटकाऱ्यांनी काढलेली ही चित्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांची रंगावली चित्रे पुस्तकात प्रसिद्ध आहेत. अशी विविध प्रकारची व्यक्तिचित्रे त्यांच्यातील समर्थ कलावंताची साक्ष देतात असे वाटते .असे त्यांच्या विषयी उद्गार प्रसिद्ध चित्रकार आणि क्युरेटर ज्यांनी चाळीसहून अधिक विविध बाल आणि तरुण चित्रकारांची चित्र प्रदर्शने आयोजित केले आहेत असे प्रा.अरविंद सावंत यांनी काढले. चुलीवर घावणे बनविण्यात व्यस्त असणाऱ्या स्त्री चित्रास त्यांना एस.पी. मेमोरियल ट्रस्ट, मुंबई पुरस्कृत थोर चित्रकार डॉ. एस.एम. पंडित यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी आयोजित केलेला पुरस्कार देण्यात आला. यासाठी या मेहनती ,गुणी चित्रकाराचे सर्व स्तरांतून खूप खूप अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

# जलतरण स्पर्धेत सुहित जीवनच्या विद्यार्थ्यांचे यश








**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**
२९ डिसेंबर रोजी सुहित जीवन ट्रस्ट, पेण येथील विद्यार्थ्यांनी मामा वास्कर जलतरण तलाव येथे आयोजित केलेल्या ॲक्वा लाइफ स्विमिंग क्लब व ग्लोरियस स्पोर्ट्स ॲकॅडमी जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीचे फळ मिळवून पदकांसह सन्मान मिळवला.

प्रथम क्रमांक मिळवणा-या प्रचिती म्हात्रे व प्रणित भगत यांनी सुवर्ण पदक व प्रमाणपत्र तर अर्णव झावरे याने रौप्य पदक व प्रमाणपत्र प्राप्त केले.या विद्यार्थ्यांचे, त्यांचे पालक व प्रशिक्षकांचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. याबद्दल आयोजकांचेही आभार व्यक्त करण्यात आले.सुहित जीवन ट्रस्ट च्या विद्यार्थ्यांनी एकात्मिक आणि उत्कृष्ट कामगिरी बजावल्यामुळे संस्थेचा मान वाढला आहे. अशी माहिती सुहित जिवन ट्रस्टच्या प्रमुख सुरेखा पाटील यांनी दिली.



# दुर्ग सांकशी किल्यावर सापडल्या शिवकालीन वास्तू

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**
पेण तालुक्यातील मुंगोशी गावाच्या शेजारी श्री दुर्ग सांकशी किल्यावर तीन ते चार वर्षांपासून पेण, पनवेल येथील श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे दुर्गसेवक स्वच्छता मोहीम राबवत आहेत.या दुर्गसेवकांनी दुर्ग संवर्धनाचा वसा घेतल्याने ते गडावरील पाण्याची टाकी, अवशेषांची साफसफाई करतात. यावेळी स्वच्छता मोहिमेत काही ऐतिहासिक वास्तू दुर्गसेवकांच्या हाती लागल्या आहेत. यात महादेवाची पिंड, नंदीबैल याची मूर्ती, शस्त्र असलेली एक रेखीव देवीची मूर्ती सापडली असल्याची माहिती मिळाली.

## बाजार समितीला जागतिक...

पान१वरून ▶▶ लागेल. शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधा उभारल्या जातील. या बैठकीनंतर पणन मंत्री श्री.रावल यांनी प्रसारमाध्यमांशीही संवाद साधला. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचा परिसर आणि कृषी व पणन मंडळाच्या निर्यात सुविधा प्रकल्पांची पाहणी केली.

बैठकीच्या सुरुवातीस पणन व राजशिष्टाचार मंत्री श्री.जयकुमार रावल यांच्यासमोर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव डॉ.पांडूरंग खंडागळे आणि मुख्य वित्त व लेखा अधिकारी मंदार साळवी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज तसेच प्रस्तावित बाबींची माहिती सादर केली.

माजी मंत्री तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शशिकांत शिंदे यांनी बैठकीच्या प्रास्ताविकात मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्री महोदयांचे लक्ष वेधले. या बैठकीच्या निमित्ताने संचालक मंडळातील काही संचालकांनी बाजार समितीचा पुनर्विकास, सध्याची कार्यपद्धती, भविष्यातील सुधारणा, अपेक्षित सोयीसुविधा याविषयी आपली मते मांडली. शेवटी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी मंत्री महोदयांचे व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## मुंबई भागविणार ठाण्याची...

पान१वरून ▶▶ महापालिकेकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

आज आमदारकेळकर यांनी मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन चर्चा केली. तसेच पाणी पुरवठा विभागाची जबाबदारी असलेले अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांचीही भेट घेतली. त्यानंतर मुंबई महापालिकेचे उपजल अभियंता (प्रचालने) पराग शेठ, कार्यकारी अभियंता जयंत खराडे, प्रकाश खराडे, ठाणे महापालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद पवार, अतुल कुलकर्णी यांची संयुक्त बैठक घेऊन चर्चा केली. ठाणे शहराला मुंबईकडून मिळणाऱ्या नियोजित ५० एमएलडी पाण्यापैकी २५ एमएलडी पाणी आधी तातडीने मिळावे याबाबत आमदारकेळकर यांनी आग्रह धरला. अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी ठाणे महापालिकेला अतिरिक्त पाणी देता येईल असे सांगितले. याबाबत असलेल्या तांत्रिक अडचणी दूर करून कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. याबाबत आमदार संजय केळकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी अतिरिक्त पाण्याबाबत मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी या आधी ठाणे महापलिकेचे आयुक्त म्हणून काम केले असल्याने त्यांना ठाणे शहराच्या पाणी पुरवठ्याची माहिती आहे. त्यांनी ठाण्याला अतिरिक्त पाणी देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आमदारकेळकर यांनी सांगितले. यावेळी ठाणे महापालिकेला कशा पद्धतीने अतिरिक्त पाणीपुरवठा करायचा यावर चर्चा झाली. मुंबई महापालिकेचे वरळी येथे पाणी पुरवठा विभागाचे नियोजन केंद्र असून तेथील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्या ठाण्याला तातडीने २५ एमएलडी पाणी निश्चित मिळेल, असा विश्वास आमदारकेळकर यांनी सांगितले.

## मेट्रो मार्गिकांसाठी निविदा...

पान१वरून ▶▶ लार्सन अँड टुब्रो कंपन्यांनी निविदा भरल्या आहेत.

**मार्गिका कधी सुरू होणार?**

एमएमआरडीएने यापूर्वी मेट्रो ४ मार्गिकेसाठी ३९ मेट्रो गाड्यांच्या खरेदीसाठी मार्च २०२१ मध्ये बॉम्बार्डियर ट्रान्सपोर्टेशन कंपनीला १,८५४ कोटी रुपयांना कंत्राट दिले होते. मात्र, त्यावेळी मेट्रो मार्गिकेच्या कारशेडच्या जागेचा तिढा कायम असल्याने ही मार्गिका कधी सुरू होणार याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्यातून गाडीचे डब्बे पुरविण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याने बॉम्बार्डियर कंपनीने हा करार एकतर्फी संपवीत असल्याचे जानेवारी २०२२ मध्ये एमएमआरडीएला कळविले होते.

कंत्राटदाराला मेट्रो गाड्या, कम्युनिकेशन बेस्ड सिग्नलिंग सिस्टम, ट्रेन कंट्रोल, प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर, डेपो मशिनरी अँड प्लँट, आदी गोष्टी पुरवाव्या लागणार आहेत. लि., एनसीसी लि. आणि सीआरआरसी नांजिंग पुझेन कंपन्यांनी निविदा भरली आहे, तर एमएमआरडीएने मेट्रो ४ या ३२.३२ किमी लांबीच्या आणि मेट्रो ४अ या २.७ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिकेसाठी मेट्रो गाड्या खरेदीसाठी फेब्रुवारीमध्ये निविदा काढल्या होत्या. यामध्ये एकूण ३९ गाड्या खरेदी केल्या जाणार आहेत. त्यासाठी एमएमआरडीएने ४ हजार २९७ कोटी रुपयांच्या निविदा मागविल्या होत्या.

**कसा आहे मेट्रो मार्ग-४**
**मुंबई मेट्रो मार्ग-४ (वडाळा - कासारवडावली)**

वडाळा ते कासारवडवली मेट्रो मार्ग ४ हा ३२.३२ किमी लांबीचा उन्नत मार्ग आहे. सदर मार्गामध्ये एकूण ३० स्थानके असतील. सदर मार्ग सध्याच्या ईस्टर्न एक्स्प्रेस रोडवे, मध्य रेल्वे, मोनोरेल, सध्या सुरू असलेला मेट्रो मार्ग २ब (डी एन नगर ते मंडाळे), मेट्रो मार्ग ५ (ठाणे ते कल्याण), मेट्रो मार्ग ६ (स्वामी समर्थनगर ते विक्रोळी) यांच्यात परस्पर जोडणी प्रदान करेल. सदर मार्ग मुंबईतील व्यावसायिक आणि महत्त्वाच्या भौगोलिक ठिकाणांवर रेल आधारित प्रवेश प्रदान करेल.

**मेट्रो ४ मार्गावरील स्थानके**

१. भक्तीपार्क मेट्रो, २. वडाळाटीटी, ३. आनिक नगरबसडेपो, ४. सिद्धार्थकॉलनी, ५. गरोडियानगर, ६. पंतनगर, ७. लक्ष्मीनगर, ८. श्रेयससिनेमा, ९. गोदरेजकंपनी, १०. विक्रोळीमेट्रो, ११. सूर्यानगर, १२. गांधीनगर, १३. नेव्हलहाऊसिंग, १४. भांडुप महापालिका, १५. भांडुप मेट्रो, १६. शांग्रीला, १७. सोनापूर, १८. फायरस्टेशन, १९. मुलुंड नाका, २०. ठाणे तीन हात नाका, २१. आरटीओ ठाणे, २२. महापालिकामार्ग, २३. कॅडबरी जंक्शन, २४. माजिवडा, २५. कापूरबावडी, २६. मानपाडा, २७. टिकूजी-नि-वाडी, २८. डोंगरीपाडा, २९. विजय गार्डन, ३०. कासारवडवली

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# ठाणे ग्रंथोत्सव २०२४ चे उद्घाटन संपन्न



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे,दि.३०:** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने 'ठाणे ग्रंथोत्सव २०२४' चे आयोजन कोपरखैरणे येथील ज्ञान विकास संस्था येथे करण्यात आले आहे. या भव्य ग्रंथोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजन करून आज करण्यात आले.

यावेळी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, ज्ञान विकास संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष ?ड पी.सी.पाटील, प्रा.माणिकराव कीर्तन वाचनालय वाशीचे सुभाष कुळकर्णी, ज्ञान विकास संस्थेचे उपध्याक्ष राम पाटील, जेष्ठ संचालक अशोक पाटील, श्री.सोन कांबळे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक देवेंद्र भुजबळ, जेष्ठ कवी अरुण म्हात्रे, ठाणे जिल्हा ग्रंथाचे अध्यक्ष चांगदेव काळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

ज्ञान विकास संस्थेचे प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, डी. व्ही. एस. इंग्रजी प्राथमिक माध्यमिक, डी. एस. महाविद्यालय, डी. व्ही. एस कॉलेज ऑफ कॉमर्स अँड. पी. सी. पाटील विधी महाविद्यालयचे विद्यार्थी या ग्रंथोत्सव दिंडी मध्ये सहभागी झाले होते. तसेच या ग्रंथोत्सव दिंडी नवी मुंबई महानगरपालिका परिमंडळ - २ उप आयुक्त कैलास गायकवाड, प्रा.माणिकराव कीर्तन वाचनालय, वाशीचे सुभाष कुलकर्णी, ज्ञान विकास संस्था कोपरखैरणेचे संस्थापक - अध्यक्ष पी. सी. पाटील, ठाणे जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील तसेच शाळा कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ज्ञान विकास संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष ?ड पी.सी.पाटील म्हणाले की, शासनाच्या सर्व कार्यक्रमांना आमच्या विद्यालयाकडून प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करतो. आमच्या विद्यालयातील सर्व विद्यार्थी कमीत कमी एक पुस्तक खरेदी करतील. वाचन चळवळ वाढविण्यासाठी हे आवश्यक आहे. ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे काम करतात. स्वतःला अद्यावत ठेवणे, स्पर्धेत टिकून रहाणे यासाठी वाचनाला पर्याय नाही. वाचनामुळे विचारात प्रगल्भता येते. नवे विचार मांडून समाजाला दिशा देणे हे ग्रंथाचे काम आहे. शासनाच्या कोणत्या उपक्रम राबविण्यासाठी हे विद्यालय नेहमी सहकार्य करेल.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर म्हणाले की, या ग्रंथोत्सवमधून आपल्या ज्ञानाचे खाद्य आपल्याला मिळणार आहे. आपण खूप भाग्यवान आहात इतका मोठा कार्यक्रम आपल्या शहरात होत आहे. या कार्यक्रमासाठी आपल्या पालकांना सुध्दा घेवून या. आपल्या आवडणाऱ्या लेखाचे एकतरी पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने वाचायला पाहिजे. ही पुस्तक आपण व पालकांनी तसेच शिक्षकांनी खरेदी करावी. वाचनाची आवड वाढली पाहिजे, यासाठी शासनाने आता वाचन प्रकल्प हाती घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे पुस्तक एक तास वाचले पाहिजे. तुम्ही काय वाचले आहे, याचे परीक्षण आपल्या हाताने लिहायचे आहे. ते परीक्षण आपल्या महाविद्यालयामध्ये जमा करायचे आहे. ही संकलित माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात येणार आहे. शासन यातून चांगले वाचक विद्यार्थ्यांना पारितोषिक देणार आहे. १ ते १५ जानेवारी मध्ये या वाचन साप्ताह राबविण्यात येत आहे, यामध्ये आपण सहभागी व्हावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी माजी पंतप्रधान मनमोहन सिंह व प्रसन्ना पाटील यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

मंगळवार, दि.३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ११:३० या कालावधीत संगीतवर्षा कला प्रतिष्ठान प्रस्तुत 'गाथा शिवकालीन इतिहासाची'या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११:३० ते ०१ या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा ज्ञानभाषा कशी बनेल?' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ०३ ते ४:३० या कालावधीत 'क-कवितेचा'या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ४:३० ते ०६ या कालावधीत ज्ञान विकास संस्था, कोपरखैरणे यांच्या कोळीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे. सायंकाळी ०६ ते ०७ या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील आदर्श ग्रंथपालांचा व उत्कृष्ट वाचकांचा सत्कार करण्यात येणार आहे. तरी, ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रंथप्रेमींनी या ग्रंथोत्सवास भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील व सूत्रसंचालन संतोष जाधव तर आभार प्रदर्शन प्रतिभा पाटील यांनी केले.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601
ईमेल- jeevandeepvartanews2020@gmail.com

## अतुल देशमुख सामाजिक 'युवा रत्न पुरस्काराने' सन्मानित



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुरबाड(दिलीप पवार)**

मुरबाड शहर व तालुक्यात गेली अनेक वर्ष विद्यार्थी, तरूण , तरूणी, जेष्ठ नागरिक यांना मदतीचा हात देऊन जिथे अन्याय होत असेल तिथे न्याय मिळवून देण्यासाठी तसेच प्रत्येक सामाजिक कार्यात, चळवळीत नेहमी अग्रेसर असणारे आमदार किसन कथोरे यांचे खंदे समर्थक अतुल देशमुख यांच्या कार्याची दखल घेत साप्ताहिक शब्द केसरी यांच्या वतीने त्यांना सामाजिक युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. अतुल देशमुख हे सतत समाज कार्याशी जोडले आहेत. त्यांचे कुटुंब हे डॉक्टर श्री आप्पा साहेब धर्माधिकारी यांच्या समर्थ बैठकीच्या विचारांशी जोडले असल्याने सामाजिक कार्याची आवड त्यांना निर्माण झाली आहे.त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे तालुक्यात सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## विनोद म्हात्रे यांचा वाढदिवस
### कार्यालयात कर्मचाऱ्यांनी केला साजरा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**डोंबिवली(प्रतिनिधी) :** खोणी ग्रुप ग्रामपंचायत मधील कर्मचारी श्री विनोद म्हात्रे ग्रामपंचायतच्या क्लार्क हुद्यावर अनेक वर्षापासून काम करीत आहे आज त्यांचा वाढदिवस कार्यालयातच मधल्या सुट्टीत जेवणाच्या वेळेत केक कापून साजरा करण्यात आला. कार्यालयातील सर्व कर्मचारी, साहेब , आणि ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते या सर्वांनी विनोदला मनापासून वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा दिल्या यावेळी ग्रामविकास अधिकारी श्री. डी ए जागरे साहेब, ग्रामपंचायत सदस्य आणि माजी सरपंच श्री हनुमान ठोंबरे आणि यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विनोदला भरभरून शुभेच्छा दिल्या.



## विभूती प्रकाशानंदजी विद्यालयाचा क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी या हेतूने विभूती प्रकाशानंदजी विद्यालयाचे मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७, २८ व ३० डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये ठाणे महानगर पालिका शाळा क्रमांक १२०, सावरकर नगर, ठाणे येथे क्रिडा महोत्सव २०२४चे आयोजन



करण्यात आले होते.या क्रिडा महोत्सवामध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी कबड्डी, खो-खो, क्रिकेट वधावणे या क्रीडा प्रकारामध्ये मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता. दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी जय भवानीनगर उद्यान, वागळे इस्टेट, ठाणे येथे विजेत्या संघांना व विजयी क्रीडापटूंना वागळे विभाग प्रमुख, माजी नगरसेवक एकनाथ भोईर, माजी परिवहन सभापती दशरथ यादव, शाखा प्रमुख संजय जाधव, उपविभाग प्रमुख संतोष जाधव व मुख्याध्यापक कुँवर राकेश तोमर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. क्रीडा स्पर्धा संपन्न करण्यासाठी क्रिडा शिक्षक संतोषकुमार आर सिंह, वरिष्ठ शिक्षक संतोष कुमार भूलन सिंह, सत्यप्रकाश सिंह, खान सफातुल्लाह, विनोद राठोड, धनंजय देसले, विनोद परदेशी, सुनील प्रजापती, प्रियंका सिंह यांनी विशेष मेहनत घेतली. सहाय्यक शिक्षक अर्जुन चेमटे यांनी विद्यार्थी सुरक्षा संभाळत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मानले.

## प्राथमिक शिक्षण विभागाचे स्थलांतर वागळे इस्टेट येथील कार्यालयात
### स्वच्छ भारत मिशन व कृषी विभाग बी. जे. हायस्कूल येथे स्थलांतर



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद ठाणे ग्रामीण भागातील शासकीय कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावत असते. जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या दृष्टीकोणातून महत्त्वाचे आणि शिक्षण विभागाचे कामकाज विस्तृत असल्याने योग्य तो समन्वय ठेवण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभाग वागळे इस्टेट येथे भाडेतत्त्वावर घेतलेल्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आला आहे. तर कृषी विभाग आणि स्वच्छ भारत मिशन विभाग बी. जे. हायस्कूल येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी प्राथमिक शिक्षण विभागाचे कामकाज स्क्वेअर फिट होम्स, एस. जी. बर्वे रोड, जि. एस. टी. भवन समोर, वागळे इस्टेट, एम.आय.डी.सी, २२ नंबर सर्कल, ठाणे (प) येथील भाडेत्तत्वावर घेतलेल्या इमारतीत तर स्वच्छ भारत मिशन आणि कृषी विभाग बी. जे. हायस्कूल टेंबीनाका, वाडीया रुग्णालय जवळ, ठाणे (प) येथे स्थलांतरित करण्यात आले असल्याने ठाणे जिल्ह्यातील सर्व संबंधित यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी